# आयुष्मान भारत योजना




- **सुरवात:** २३ सप्टेंबर २०१८ रोजी 'आयुष्मान भारत' किंवा 'प्रधानमंत्री जनआरोग्य योजना'चे शुभारंभ केले.
- **कोठे:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंडची राजधानी रांची येथे
- ही गरीबांसाठीची योजना आहे व अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तिन्ही देशांच्या एकत्रित लोकसंख्येपेक्षा जास्त लोकांना या योजनेचा लाभ मिळणा आहे.

## योजनेचे वैशिष्ट्ये




- एकाच वेळी ४४५ जिल्ह्यात ही योजना लागू झाली आहे.
- एकूण १३ हजार रुग्णालये या योजनेमध्ये सहभागी झाली आहेत.
- यामध्ये कर्करोग, हृदयरोग, किडनी व लिव्हरचे आजार, मधुमेह ४ यासह १३०० आजारांचा समावेश या योजनेमध्ये केला आहे.
- या योजनेंतर्गत लाभार्थींच्या कुटुंबासाठी सुमारे एक ते दीड लाखापर्यंत आरोग्य विम्याची तरतूद करण्यात येईल. त्यासाठी आरोग्यसेवेची गरज पडल्यास त्याचा खर्च थेट राज्य सरकार मार्फत करण्यात येईल.
- आयुष्मान भारत योजनेसाठी शहरी भागातील ११ वर्गातील कुटुंबाचा समावेश केला आहे. यामध्ये कचरा वेचणारे, बांधकाम मजूर, घरकाम करणारे, फेरीवाले, भिकारी इ.ग्रामीण भागामध्ये घराची भौगोलिक स्थिती कुटुंबातील कमावत्या व्यक्ती, अनुसूचित जाती व जमाती, भूमिहीन शेतकरी आदी वर्गातील कुटुंबाची निवड केली आहे.

## उद्देश :

- गरीब, वंचित ग्रामीण कुटुंबांना आरोग्य सेवा पुरविणे हा या योजनेचा मुळ उद्देश आहे.

- २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील ८.०३ कोटी कुटुंबे आणि शहरी भागातील २.३३ कोटी कुटुंबांना या योजनेच्या अंतर्गत समाविष्ठ केले आहे.
- सुमारे ५० कोटी जनतेचा समावेश यामध्ये करण्यात येणार आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये ही योजना कॅशलेस आणि पेपरलेस पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

**अपात्रता:**

- सरकारी नोकरीधारक व त्यांचे कुटुंब
- दुचाकी, तिचाकी, ट्रॅक्टर अथवा कोणतेही वाहन चारचाकी वाहन मालक असल्यास.
- कुटुंबांमध्ये कोणाकडेही रु.५०,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या मर्यादेचे क्रेडिट कार्ड असल्यास.
- कुटुंबंतील व्यक्तींचे अथवा स्वतःचे मासिक उत्पन्न रु. १०,००० पेक्षा जास्त असल्यास.
- जनआरोग्य योजनेसाठी नियुक्त टीपीए (थर्ड पार्टी ॲडमिनिस्ट्रेशन) मार्फतच केली जाईल व याची रक्कम थेट सरकारमार्फत दिली जाईल.
- रुग्णालयामार्फत करण्यात येणाऱ्या दाव्यांच्या तपासणीसाठी स्वतंत्र टीम स्थापन करण्यात येणार आहे.

byjusexamprep.com